MHBI120003352018

**नियमित दिवाणी दावा क. ६७/२०१८
मधील निशाणी कमांक ३८ वर आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी वादी क. १ लिंबाजी रायभान रोटे यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रदद करून मिळण्यासाठी अर्ज दाखल करण्यास झालेला उशीर माफ होवून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. उपरोक्त अर्जदार यांनी असे नमुद केले आहे की, वादी क. १ लिंबाजी रायभान रोटे हे दिनांक ०४.०६.२०१९ रोजी मयत झाले आहेत. वादी क. १ यांनी दिनांक २१.०८.२०१८ रोजी वादमिळकतीतील त्यांचा हिस्सा अर्जदार यांना विक्री केला आहे. त्यानंतर अर्जदार हे वादमिळकतीचे मालक झाले असून ताबेकब्ज्यात आहेत. वादी क. १ यांच्या मृत्यूनंतर अर्जदार यांना वादमिळकतीबाबत प्रतिवादीविरूध्द दाद मागण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. अर्जदार यांनी वादी क. १ यांच्या हिस्स्याची वादमिळकत खरेदी केली असल्याने वादी क. १ यांचे वादमिळकतीबाबत अर्जदार हे वादी क.१ यांचे कायदेशीर वारस आहेत. वादी क. १ यांच्या मृत्युनंतर कायदेशीर वारसांना दाव्यात सामाविष्ठ करणेस विलंब झाला आहे. त्यामुळे सदरचा दावा वादी क.१ यांचेविरूध्द अबेट झाला आहे. सदर अबेटमेंट आदेश रदद करून मिळण्यासाठी अर्ज दाखल करण्यास उशीर झाला आहे. प्रस्तुत प्रकरणाबाबत अर्जदारा यांना दिनांक ०१.१२.२०२१ पर्यंत माहिती नसल्याने सदरचा अर्ज मुदतीत दाखल करू शकले नाहीत. सदरचा अर्ज मंजूर न झाल्यास वादींचे अपरिमीत नुकसान होईल ते कशानेही भरून निघणार नाही. सबब सदरचा अर्ज मंजूर कण्यात यावा.

३. अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे सादर केले आहे. प्रतिवादी १ व २ यांनी असे नमुद केले आहे की, अर्जदार यांनी उशीर झाले बाबत संयुक्तीक कारण

दिलेले नाही. वादमिळकतीबाबत अर्जदार यांना कोणतेही कायदेशीर अधिकार नाहीत. सबब सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा.

४. अर्ज व त्यावरील प्रतिवादींच्या म्हणण्याचे अवलोकन केले. दोन्ही बाजूचा युक्तीवाद ऐकला.

५. वादी क्रमांक १ दिनांक ०४.०६.२०१९ रोजी मयत झाले आहेत. दिनांक ०३.११.२०१९ पर्यंत अबेटमेंटचा आदेश रदद करून घेणे आवश्यक होते. प्रस्तुतचा अर्ज दिनांक ०२.१२.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे लक्षात येते की उपरोक्त अर्जदार यांनी झालेल्या विलंबाबत संयुक्तिक कारण दर्शविले आहे. नैसर्गिक न्यायाच्या तत्वाच्या दृष्टीने अर्जदार यांना वादी क्र. १ यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर आणण्याची संधी देणे गरजेचे आहे. तशी संधी न दिल्यास त्यांचे अपरीमीत नुकसान होण्याची शक्यता आहे. प्रस्तुत प्रकरणातील वाद विषय व झालेला विलंब लक्षात घेता प्रतिवादी क्र. १ व २ यांना खर्चाची रक्कम रू. २००/— देणे न्यायोचित आहे. वरील सर्व कारणांचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे सबब मी खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

**१.** सदरचा अर्ज (**निशाणी क्र. ३८**) अर्जदार यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना एकत्रित खर्चाची रक्कम रू. २००/— देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२.** वादी क्र. १ लिंबाजी रायभान रोटे यांचे विरूध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यासाठी अर्ज दाखल करण्यास झालेला उशीर माफ करण्यात येत आहे.

दि. ०९.१२.२०२१ (रा.व.कदम)
स्थळ: धारूर सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
धारूर

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अभिकथन करतो की, या पी.डी.एफ. वरून अपलोड केलेल्या आदेश/न्यायनिर्णयातील शब्द—नि—शब्द हे मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **लघुलेखक ग्रेड.३** | : | **ए.एस.गंगणे** |
| न्यायालयाचे नाव | : | सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर |
| न्यायनिर्णय/आदेशाची तारीख | : | ०९.१२.२०२१ |
| न्यायनिर्णय/आदेशावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०९.१२.२०२१ |
| न्यायनिर्णय/आदेश अपलोड केल्याची तारीख | : | १०.१२.२०२१ |

**सही/—**
(ए.एस.गंगणे)
(लघुलेखक ग्रेड—३)
सह दिवाणी न्यायालय क. स्तर, धारूर